आवृत्ती - १

# मतदान दिवसाच्या शेवटच्या ७२ तासांसाठी तपासणी सूची

**भारत निवडणूक आयोग**
**Election Commission of India**
निर्वाचन सदन, अशोका रोड,
नवी दिल्ली ११० ००१

# मतदान दिवसाच्या शेवटच्या
# ७२ तासांसाठी तपासणी सूची

**भारत निवडणूक आयोग**

**Election  Commission of India**

निर्वाचन सदन, अशोका रोड,

नवी दिल्ली ११० ००१

(शा.म.मु.) वाय २५३१ (५३०—२-२०२४)

## शेवटचे ७२ तास (पी - ३)

| अनु. क्रमांक | तपशील | महत्त्वाची कार्ये |
|---|---|---|
| १ | मतदान कर्मचाऱ्यांचे व्यवस्थापन | • दुर्गम भागातील मतदान कर्मचाऱ्यांचे तिसरे यादृच्छिकीकरण.<br>• निवडणूक घेण्यासाठी मतदान संचलन पथके स्थापन झाल्यानंतर लगेचच प्रमाणपत्र सादर करणे.<br>• सर्व मतदान केंद्रावर आश्वासित किमान सुविधांची सुनिश्चिती करणे.<br>• मतदान कर्मचाऱ्यांच्या कल्याणाची सर्व व्यवस्था, मतदान केंद्रावर राहण्याची व जेवणाची, व्यवस्था सुनिश्चित करणे.<br>• मतदान केंद्रावर/ठिकाणी वैद्यकीय सुविधा.<br>• मतदान कर्मचारी व इतर निवडणूक यंत्रणा यांच्या वाहतुकीची व्यवस्था. |
| २ | मतदानाच्या स्थळावरील विविध नागरी (दलेतर) उपाय योजना. | • अतिसंवेदनशील मतदान केंद्रांत कमीतकमी एक किंवा अधिक दलेतर उपाययोजनांचा समावेश करण्यात येईलः सूक्ष्म निरीक्षक, व्हिडीओ कॅमेरा, वेबप्रसारण (वेबकास्ट) आणि सी सी टी व्ही.<br>• मतदानाच्या दोन दिवस अगोदर, क्षेत्र अधिकारी आणि मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांना वेबकास्टिंगचे प्रशिक्षण देणे आणि वेबकास्टिंग आणि थेट तपासणी यांच्या पर्यवेक्षणात त्यांना सहभागी करून घेणे.<br>• वेबकास्टिंगच्या समस्या निवारणासाठी गटाची स्थापना करणे.<br>• छायांकित क्षेत्रे व्यवस्था, दळणवळण पायाभूत सुविधा आणि पर्यायी व्यवस्था इत्यादीचे आगाऊ नियोजन करणे. |
| ३ | कायदा व सुव्यवस्था सुरक्षा व्यवस्था. | • जिल्हा स्तरावर, जिल्हा निवडणूक अधिकारी, मतदान समाप्ती अतिसंवेदनशील अशा ७२ तासांसाठी, कायदा व सुव्यवस्था परिस्थिती हाताळण्यासाठी पोलीस महानिरीक्षक व खर्च निरीक्षक यांच्या उपस्थितीत आयुक्त/पोलीस आधीक्षक वरिष्ठ पोलीस अधिकारी, यांच्या सोबत एक विशेष बैठक घेईल. |
| ४ | धनशक्तीच्या गैरवापरास आळा घालण्यासाठी विशेष प्रयत्न. | • आंतरराज्यीय व आंतरराष्ट्रीय सीमेवर व तपासणी करणे व तपासणी नाके स्थापन करणे.<br>• मतदानरांना प्रलोभन देण्याच्या सर्व प्रकारांचा माग काढणे आणि कोणत्याही गैरप्रकारांवर लक्ष ठेवणे. |
| ५ | इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र (इव्हीएम) व व्ही व्ही पॅट यांचे व्यवस्थापन. | • भारत इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेड (बी इ एल) /इलेक्ट्रॉनिक कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड (इ सी आय एल) यांची नियुक्ती योजना.<br>• मतदान केंद्र, मध्यवर्ती सुरक्षा कक्ष, मतदान सुरक्षा कक्ष, राखीव आणि दुरुस्त सुरक्षा कक्ष, इत्यादी ठिकाणावर इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र, व्ही व्ही पॅट यांची वाहतूक साठवण व सुरक्षा.<br>• इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र आणि व्ही व्ही पॅट वाहून नेणाऱ्या सर्व वाहनांचा मागोवा घेणारी व्यवस्था. |

| | | |
|---|---|---|
| ६ | खर्च संनियंत्रण व्यवस्था. | • सर्व निवडणूक खर्च संनियंत्रण पथकांना संवेदनशील करणे.<br>• भरारी पथक, स्थैतिक संनिरीक्षण पथक पुरेशा पोलीस/सुरक्षा रक्षकांअभावी बरखास्त करू नयेत.<br>• पी-३ या दिवशी व तेव्हापासून स्थैतिक संनियंत्रण पथके ( एस एस टी ) पोलीस ठाणे/ चौकीनिहाय वाढविता येतील. |
| ७ | खर्च संनियंत्रणासाठी विशेष लक्ष देण्याची क्षेत्रे. | • स्वयं सहायता गट ( एस एच जी ) आणि अशासकीय संघटना ( एन जी ओ ) यांसाठी निधींचे संवितरण.<br>• विवाह/ सामूहिक सभागृह, इत्यादींमध्ये भेटवस्तुंचे वितरण/मोफत जेवण देणे, इत्यादी.<br>• सामूहिक स्वयंपाकघर/लंगरचे आयोजन.<br>• अतिथीगृह आणि धर्मशाळांमधील मेळाव्यांवर लक्ष ठेवणे.<br>• सरकारी योजनेअंतर्गत कोणतेही वेतन व इतर लाभ सांवितरित केले जात नाहीत. |
| ८ | मतदारांचे प्रबोधन | • मतदारांच्या प्रबोधन विषयक व जनजागृतीसाठी खालील बाबींवर लक्ष केंद्रित करणे,—<br>• मतदानांचे दिनांक.<br>• मतदान सुरू होण्याची व संपण्याची वेळ.<br>• मतदान केंद्राची ठिकाणे<br>• ओळखीचा वैध पुरावा असणाऱ्या कागदपत्रांची यादी.<br>• नैतिक आणि माहितीपूर्ण मतदान<br>• मतदान केंद्रांवर सुव्यवस्थित आणि शांततेने चालविणे आवश्यक आहे.<br>• मतदानाच्या दिवशी होणारे गुन्हे/गैरप्रकार<br>• इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र/व्हीव्हीपॅट याबाबत जनजागृतीसाठी डिजीटल मतदार संपर्क ( आउटरिच ) कार्यक्रम.<br>• सीव्हीजिल ॲप, राष्ट्रीय तक्रार निवारण मुख्य संकेतस्थळ ( पोर्टेल ), सक्षम ॲप, मतदार सहायता उपयोजक, उमेदवार जाणून घेणे, निकालाचे मुख्य संकेतस्थळ इत्यादी. |

# शेवटचे ४८ तास (पी-२)

| अनु. क्रमांक | तपशील | अंतिम ४८ तास (पी-२) महत्त्वाची कार्ये |
|---|---|---|
| १. | कर्मचारीवर्ग आणि साहित्य यांचे व्यवस्थापन. | • मतदान कर्मचाऱ्यांचे तिसरे यादृच्छिकीकरण.<br>• निवडणुकीसाठी मतदान संचलन पथके तयार झाल्यानंतर, लगेचच प्रमाणपत्र सादर करणे.<br>• मतदानाच्या दिवसासाठी मनुष्यबळ, साहित्य व वाहणे याची उपलब्धता.<br>• वितरण केंद्राची व्यवस्था पूर्ण करणे.<br>• मतदान कर्मचाऱ्यांना घेऊन जाण्याची व सोडण्याची व्यवस्था |
| २. | कायदा व सुव्यवस्था. | • फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (सी. आर. पी.सी) याच्या कलम १४४ अन्वये आदेश जारी करणे. |
| ३. | इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र (इ. व्ही.एम) व व्ही व्ही पॅट | • मध्यवर्ती सुरक्षा कक्षामध्ये व्यवस्था करणे.<br>• पी-३ कालावधीत मतदान संचलन पथकांचे संनियत्रण. |
| ४. | खर्चाचे सनियंत्रण. | • विनापरवाना परिवास्तूंमध्ये मद्यसाठा करण्यावर कायद्यात वापरलेल्या सर्व निर्बंधाची कडक अंमलबजावणी करण्यात येईल.<br>• लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ च्या कलम १३५ ग अन्वये दारुबंदी दिवसाची घोषणा करणे. |
| ५. | आदर्श आचार संहिता | • ध्वनीक्षेपक यंत्राच्या वापरास बंदी.<br>• प्रचाराचा कालावधी संपल्या नंतर मतदारसंघात राजकीय पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीवर बंदी. |
| ६. | प्रसारमाध्यम प्रकरण. | • कलम १२६, जनमत आणि मतदानोत्तर जनमत.<br>• प्रसारमाध्यम व्यक्तीला प्राधिकार पत्र देण्याचे काम पूर्ण करणे.<br>• गुन्हेगारी पार्श्वभूमीचे प्रकाशन |
| **अनु. क्रमांक** | **तपशील** | **अंतिम २४ तास (पी-१) महत्त्वाची कार्ये** |
| १. | कर्मचारीवर्ग आणि साहीत्य व्यवस्थापन | • तिसऱ्या यादृच्छिकनिहित मतदान संचलन पथकांचे मोहरबंद लिफाफा उघडणे.<br>• व्हिडीओग्राफी अंतर्गत उमेदवार /त्यांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र सुरक्षा कक्षाचे उद्‌घाटन करणे व ते बंद करणे.<br>• यथायोग्य सुरक्षेत/संरक्षणांअंतर्गत मतदान पक्ष आणि साहित्य जागच्या जागी ठवणे.<br>• टपाली मतपत्रिकांसाठी सुविधा केंद्र.<br>• वितरण केंद्राच्या मागणीवरून प्रशिक्षण<br>• मतदान संचलन पथके रवाना होऊन ते मतदान केंद्रांवर पोहचेपर्यंतचे त्यांचे संनियत्रण करणे.<br>• नियंत्रण कक्षाचे २४×७ तास कामकाज. |

| | | |
|---|---|---|
| २. | तक्रार/निवारण व्यवस्था. | • गट/तहसील स्तरावर तक्रार हाताळण्याची व्यवस्था.<br>• मतदान प्रतिनिधीच्या तक्रारीवर तातडीने चौकशी.<br>• तक्रारीचा वेळेवर निपटारा करणे.<br>• ०३ नियंत्रण कक्षांची उभारणी : संपर्क नियंत्रण कक्ष,माध्यम संनियंत्रण कक्ष आणि वेबप्रसारण (बेवकास्टींग) नियंत्रण कक्ष. |
| **अनु. क्रमांक** | **तपशील** | **मतदान दिवस (पी-०)<br>महत्वाची कार्ये.** |
| १. | मतदान केंद्र आणि कर्मचारी वर्गाची व्यवस्था | • योजनेनुसार मतदान केंद्रावर सुरक्षा रक्षकांसह सर्व मतदान कर्मचाऱ्याची उपलब्धता.<br>• अभिरुप मतदानाच्या आयोजनाचे संनियंत्रण करणे.<br>• मतदान वेळेवर सुरू करणे.<br>• बंद पडलेले इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र (इ व्ही एम) आणि व्हीव्हीपॅट वेळेत बदलणे.<br>• मतदान समाप्तीचे संनियंत्रण करणे.<br>• क्षेत्र अधिकाऱ्याची हालचाल. |
| २. | मतदान दिवसाचा अहवाल देणे. | • मतदान पक्षाचे आगमन आणि कामास सुरूवात याची माहिती देणे.<br>• विधानसभा मतदारसंघाच्या सर्व मतदान केंद्रावर अभिरूप मतदान घेण्यासंबंधातील माहिती कळविण्यात येईल.<br>• मतदान सुरू करण्यासंबंधातील माहिती.<br>• मतदानाच्या दिवशी सकाळी ९ वा., सकाळी ११वा., दुपारी १वा., दुपारी ३ वा. आणि सायंकाळी ५ वाजेपर्यंत मतदानाच्या टक्केवारीची माहिती.<br>• मतदानाच्या दिवशी सकाळी ९ वाजता, सकाळी ११वा., दुपारी १वा., दुपारी ३वा. आणि सायंकाळी ५ वाजता इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र आणि व्हीव्हीपॅट बदलण्यासंदर्भातील माहिती.<br>• मतदानादरम्यान, मतदान केंद्राध्यक्ष आणि इतर कर्मचारी मतदान केंद्रामध्ये आपला भ्रमनध्वनी (सायलंट) नीरव स्थितीत ठेवतील. गरज भासली तरच ते मतदान केंद्राबाहेर जाऊन बोलू शकतील.<br>• मतदानाच्या दिवशी संध्याकाळी ७ वाजता मतदान छायाचित्र ओळखपत्र संबंधातील माहिती. |
| ३. | आदर्श आचार संहिता-सर्वसाधारण निर्बंध. | • उमेदवार, मतदान प्रतिनिधी आणि उमेदवाराचे कार्यकर्ते/पक्ष कार्यकर्ते यांच्यासाठी प्रत्येकी एका वाहनाचा वापर.<br>• जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याने दिलेले परवाने, वाहनाच्या समोरच्या काचेवर (विंड स्क्रिन) लावावेत.<br>• या वाहनांद्वारे मतदारांची वाहतूक-लोक-प्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ च्या कलम १३३ अन्वये भ्रष्टाआचरण आणि कलम १२३(५) नुसार दंडात्मक कारवाई.<br>• मतदान केंद्राच्या १०० मीटरच्या आतमध्ये कर्तव्यावर असलेल्या अधिकाऱ्यांव्यतिरिक्त सेलफोन बिनतारी (कॉडलेस) दूरध्वनी, इत्यादी नेण्यास परवानगी असणार नाही.<br>• मतदान पावती (स्लीप) ही उमेदवाराचे नाव/पक्षाचे चिन्ह/नसलेली साधी सफेद रंगाची स्लीप असावी.<br>• मतदान केंद्रापासून १०० मीटरच्या आतमध्ये प्रचाराशी संबंधित भितीपत्रक किंवा निशाण लावू नये.<br>• मतदान केंद्राच्या १०० मीटरच्या आतमध्ये ध्वनीक्षेपक यंत्र (लाऊडस्पीकर), मेगा फोन, व गैरशिस्त वर्तन इत्यादींवर बंदी घालणे. |

| | | |
|---|---|---|
| ४ | संकलन केंद्र | • संकलन केंद्राची यथायोग्य व्यवस्था करणे.<br>• इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र/व्हीव्हीपॅट आणि निवडणूक पेपर यांसाठी वेगळे काउंटर असणे.<br>• संकलन केंद्रावर यथायोग्य सुरक्षा ठेवणे. |
| ५. | इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र/व्ही व्ही पॅट आणि निवडणूक पेपर यांची साठवण. | • मतदान निहित इव्हीएम सुरक्षा कक्षात मतदान निहित इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र आणि व्हीव्हीपॅट यांच्या साठवणुकीची यथायोग्य सुनिश्चिती करणे.<br>• अकार्यकारी आणि राखीव इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र आणि व्हीव्हीपॅट, विहित केलेल्या सुरक्षेसह मतदान निहित इलेकट्रॉनिक मतदान यंत्राच्या सान्निध्यात नसलेल्या वेगळ्या सुरक्षा कक्षात ठेवावेत.<br>• मतदान झालेल्या इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र सुरक्षा कक्षाच्या सुरक्षेसाठी पुरेशा केंद्रीय सशस्त्र पोलीस दलाच्या सुरक्षेची सुनिश्चिती करणे. |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई



**भारत निवडणूक आयोग**

निर्वाचन सदन, अशोका रोड,

नवी दिल्ली  ११० ००१